शेअर बाजाराची मोठी झेप; सेन्सेक्समध्ये १४३६ अंकांची उसळी

नवी दिल्ली, दि. २ (वृत्तसंस्था) : नवीन वर्षाच्या दुसऱ्या ट्रेडिंग सत्रात भारतीय बाजारात चांगली वाढ पाहायला मिळत आहे. गुरुवार हा निफ्टीसाठी २०२५ चा पहिला एक्सपायरी दिवस होता, ज्यामध्ये बाजाराने खालच्या स्तरावरून मोठी झेप घेतली. निफ्टी-सेन्सेक्स एका सत्रात सुमारे २% च्या वाढीसह कार्यरत दिसले. आजच्या वाढीनंतर, BSE वर लिस्टेड असलेल्या सर्व कंपन्यांच्या एकूण बाजार भांडवलात सुमारे ५.९ लाख कोटींची वाढ झाली आहे. बीएसईचे सर्व सेक्टर या दिवशी खरेदीने बंद झाले. मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्येही

खरेदी दिसून आली. जर आपण क्षेत्रीय आघाडीवर नजर टाकली तर ऑटो आणि आयटी समभागांमध्ये चांगली वाढ झाली. बँकिंग, PSE, तेल आणि वायू निर्देशांक वाढीने बंद झाले. आज मेटल आणि रियल्टी निर्देशांकात वाढ झाली. मात्र, बाजारातील वाढीमुळे डॉलरच्या तुलनेत रुपया खालच्या पातळीवर बंद झाला. रुपया १० पैशांनी कमजोर होऊन ८५.७५ वर बंद झाला. बॉम्बे स्टॉक एक्सचेंज बेंचमार्क सेन्सेक्स १,४३६.३० अंकांनी वाढून ७९,९४३.७१ वर बंद झाला आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज निफ्टी ४४५.७५ अंकांनी वाढून २४,१८८.६५ वर बंद झाला. आजच्या व्यवहारात सुमारे २३१२ शेअर्स वाढले तर १४९६ शेअर्समध्ये घट झाली आणि १०८ शेअर्समध्ये कोणताही बदल झाला नाही. याशिवाय, निफ्टीमध्ये बजाज फिनसर्व्ह, आयशर मोटर्स, बजाज फायनान्स, मारुती सुझुकी, श्रीराम फायनान्स हे टॉप गेनर्स होते, तर ब्रिटानिया इंडस्ट्रीज, सन फार्मा यांच्या घसरण पाहायला मिळाली. गुरुवारी बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकात प्रत्येकी एक टक्का वाढ झाली. ऑटो इंडेक्समध्ये ३.५ टक्के आणि आयटी निर्देशांकात २ टक्क्यांची वाढ दिसून आली. याशिवाय सर्व क्षेत्रीय निर्देशांक हिरव्या चिन्हावर बंद झाले. बँकिंग आणि आयटी समभागांमध्ये जोरदार खरेदी, आगामी तिमाही कमाईकडे सकारात्मक आणि आश्वासक तांत्रिक दृष्टीकोन यामुळे बाजारातील आजची वाढ दिसून आली.

अवघ्या १० मिनिटांत रुग्णवाहिका दारात उभी राहणार, ब्लिंकइटने सुरू केली नवीन सेवा

नवी दिल्ली, दि. २ (वृत्तसंस्था) : क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म Blinkit ने एक मोठी घोषणा केली आहे. आतापर्यंत Blinkit वरुन दैनंदिन वापराच्या वस्तू मागवल्या जायच्या, पण आता यावरुन Ambulance बोलवता येणार आहे. गुरुग्राममध्ये आजपासून ही सेवा सुरू होत असल्याची माहिती कंपनीने दिली. ब्लिंकिटने सांगितल्यानुसार, येत्या काळात ही सेवा इतर शहरांमध्ये सुरू करण्यात येणार आहे. गुरुग्रामसाठी सध्या पाच रुग्णवाहिका सुरू करण्यात आल्या आहेत. आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत लोक ब्लिंकिट ॲपद्वारे रुग्णवाहिका बोलवू शकतात.

ब्लिंकइटमध्ये रुग्णवाहिका बुक करण्यासाठी बेसिक लाइफ सपोर्ट (बीएलएस) पर्याय जोडण्यात आला आहे. ॲम्ब्युलन्समध्ये कोणत्या सुविधा दिल्या जाणार, याबाबत ब्लिंकिटने माहिती दिली. कंपनीने केलेल्या पोस्टमध्ये २००० रुपयांमध्ये रुग्णवाहिका मागवता येईल, असे लिहिले आहे. मात्र, त्यात व्हेंटिलेटरचा सपोर्ट नाही. ब्लिंकिटच्या रुग्णवाहिकेत जीवन रक्षक उपकरणे असतील. यामध्ये ऑक्सिजन सिलेंडर, ऑटोमॅटिक एक्स्टर्नल डिफिब्रिलेटर(AED), स्ट्रेचर, मॉनिटर,

सक्शन मशीन आणि इतर आपत्कालीन औषधांचा समावेश आहे.

प्रत्येक रुग्णवाहिकेत पॅरामेडिक, सहाय्यक आणि प्रशिक्षित ड्रायव्हर असेल. कंपनीला या सेवेतून नफा कमवायचा नाही, त्यामुळेच ही सेवा परवडणाऱ्या किमतीत ठेवण्यात आल्याचे कंपनीने म्हटले आहे. भविष्यात कंपनी त्यात गुंतवणूकही करणार आहे. ब्लिंकिटच्या मते, ही सेवा हळूहळू वाढवली जाईल. येत्या दोन वर्षांत प्रत्येक मोठ्या शहरात ही सेवा उपलब्ध करून देण्याची कंपनीची योजना आहे. दरम्यान, ब्लिंकिटने रुग्णवाहिका सेवा देण्यासाठी रेड हेल्थसोबत भागीदारी केली आहे. रेड हेल्थ, ही एक रुग्णवाहिका सेवा देणारी कंपनी आहे, जी २४/७ रुग्णवाहिका सेवा देते.

भारतात आयटी क्षेत्र पडणार मागे? नवीन सेक्टरमध्ये देश जागतिक हॉट-स्पॉट, तरुणांना रोजगाराची संधी

नवी दिल्ली, दि. २ (वृत्तसंस्था) : देशाच्या प्रगतीत आयटी क्षेत्राचा मोठा वाटा आहे. अनेक भारतीय आयटी कंपन्या जगभर आपली सेवा देत आहेत. मात्र, आता आयटी सेक्टर हळूहळू मागे पडत असल्याचे चित्र आहे. ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) त्याची जागा घेत असल्याचे दिसत आहे. आयटीने आपली वाढ कायम ठेवण्यासाठी खूप संघर्ष केला. भारत जगभरात ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरची राजधानी म्हणून उदयास येत आहे. भारताने २०२४ मध्ये ३ लाखांहून अधिक कर्मचारी यात जोडले. त्यांचे बाजार भांडवल सुमारे २० अब्ज डॉलर्सचे आहे.

दुसरीकडे, आयटी कंपन्यांमध्ये याच कालावधीत सुमार १ लाखांपेक्षा जास्त कर्मचारी कपात करण्यात आली. तर भांडवल केवळ ६ अब्ज डॉलरने वाढले आहे. उत्तर अमेरिका आणि युरोपच्या प्रमुख बाजारपेठांमध्ये स्थूल आर्थिक मंदीमुळे आयटी उद्योगात मागणी नसल्याचे अशी परिस्थिती उद्‌भवली आहे.

टॉप आयटी कंपन्या या मार्केटमधून त्यांच्या कमाईच्या ५०-६५% कमावतात. मंदी आता ओसरल्याचे दिसत असले तरी या दोन्ही उद्योगांचे भवितव्य काय असेल यावर चर्चा सुरू आहे. भारत जागतिक ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरचं हॉटस्पॉट बनला आहे. सरकारी धोरणे आणि कौशल्य विकासमधील गुंतवणुकीमुळेही या वाढीला चालना मिळाली असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर हे कुठल्याही कंपनीतील इन हाउस युनिट आहे. आयटी आणि संबंधित व्यवसायाच्या कामासाठी परदेशी कंपनीने ते तयार केले आहे. जीसीसीला कॅप्टिव्ह देखील म्हणतात. हे युनिट कंपन्यांना विविध प्रकारचे कौशल्य आणि उपाय देते. त्यामुळे येत्या काही वर्षांत यात झपाट्याने वाढ होणार असल्याचा अंदाज आहे. २०२४ मध्ये देशात १,७०० पेक्षा जास्त जीसीसी होते. तर निर्यात महसूल ६५ अब्ज डॉलर्स होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही वाढ ४०% पेक्षा जास्त आहे. शिवाय, भारताच्या आर्थिक सर्वेक्षण २०२४ मध्ये असे दिसून आले आहे की GCC २०३० पर्यंत भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात सुमारे ३.५% योगदान देईल. यातून तोपर्यंत १२१ बिलियन डॉलर्सचा अंदाजे महसूल निर्माण होईल.

भारतातील GCC जागतिक कंपन्यांसाठी निर्णय घेण्याची प्रक्रिया पुढे नेत आहेत. आता ते केवळ बॅक ऑफिस राहिलेले नाहीत. विशेष म्हणजे, जीसीसीमध्ये नेतृत्वाच्या भूमिकेत भारतीयांचा वाटा सुमारे १०-१३% असल्याचे डेटावरुन दिसते. सध्या, सुमारे १०० भारतीय मुख्य गुंतवणूक अधिकारी/वरिष्ठ उपाध्यक्ष जीसीसीमध्ये काम करतात. त्यांचे पगार कोट्यवधी रुपयांमध्ये आहेत.

नव्या वर्षात सोन्या-चांदीची चमक वाढली

नवी दिल्ली, दि. २ (वृत्तसंस्था) : नव्या वर्षात सोन्या-चांदीच्या दरात सातत्यानं वाढ होत आहे. गुरुवार, २ जानेवारी रोजी २४ कॅरेट सोन्याचा भाव सरासरी १८६ रुपयांनी वाढून ७६,७६९ रुपये प्रति १० ग्रॅम झाला. तर चांदीच्या दरात प्रति किलो ८५२ रुपयांनी वाढ झाली आहे. चांदीचा दर सरासरी ८६,९०७ रुपये प्रति किलो होता. आयबीजेएनं हा दर जाहीर केला आहे, ज्यामध्ये जीएसटीचा समावेश नाही. कदाचित तुमच्या शहरात १००० ते २००० रुपयांचा फरक असू शकतो. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन (IBJA) ही १०४ वर्षे जुनी संघटना आहे. आयबीजेए दिवसातून दोनदा दुपारी आणि संध्याकाळी सोन्याचे दर जाहीर करते. अर्थ मंत्रालय आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं जारी केलेल्या विविध अधिसूचनेनुसार हे दर सॉवरेन आणि बॉन्ड जारी करण्यासाठी बेंचमार्क दर आहेत. आयबीजेएची २९ राज्यांमध्ये कार्यालये आहेत आणि ती सर्व सरकारी संस्थांचा भाग आहे. सोन्याचे दर आपल्या ऑल टाईम हायपेक्षा केवळ २९१२ रुपये आणि चांदी ११४३३ रुपयांनी स्वस्त आहे.

दि पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद

रजि नं. वाय.एम.एल/पी.एस.डी/बी.एन.के/ओ.१४३/१९८५
मुख्य कार्यालय प्रशासकीय भवन,तलाव ले-आउट,
पुसद-४४५२०४,फोन नं.२४६३७१,२४८०२१,फॅक्स नं.(०७२३३) २४५७६१

-: स्थावर मालमत्ता जाहिर फेर-लिलाव सुचना :-

खालील नमुद केलेल्या थकबाकीदारांनी त्यांच्या नावासमोर दर्शविलेली रक्कम वेळोवेळी मागणी सुचना व समन्सेस देऊनही बँकेकडे भरणा न केल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 मधील तरतुदी नुसार गहाणात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्री संबंधीच्या सुचना देऊनही अद्याप पावेतो थकबाकीदारांनी थकीत रकमेचा भरणा केलेला नाही. त्यामुळे सदर मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्याच स्थितीत खाली नमुद केलेल्या ठिकाणी व दिलेल्या वेळेवर जाहिर फेर-लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी फेर-लिलावात भाग घेणेसाठी फेर-लिलावाच्या ठिकाणी वेळेवर हजर राहावे. फेर-लिलावाच्या अटी व शर्ती बँकेच्या पनवेल शाखा येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. त्याच प्रमाणे मालमत्तेच्या प्रत्यक्ष पाहणीसाठी व अधिक माहितीसाठी वसुली अधिकारी दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद शाखा पनवेल यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

अ. क्र.	थकबाकीदाराचे नाव व पत्ता	वसुली दाखला क्रमांक व दिनांक	कर्ज येणे बाकी	लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन
1	श्री.कुणाल भास्कर म्हात्रे रा.10, लक्ष्मन स्मृती चाळ, सुभाष रोड, नवापाडा, रामचंद्र कॉम्प्लेक्स जवळ, डोंबिवली (प) ठाणे. **जामीनदार :-** 1) श्री.कुंदन एकनाथ म्हात्रे 2) श्री.आकाश सुरेश सिंग 3) श्री.शैलेष मानसिंग दरेकर	1055/22 दि.10/05/2022	रु. 1,23,57,860/- दि.01/08/2021 पासुनचे व्याज + सरचार्ज + वसुली खर्च	हकर्जदार/जामीनदार श्री.कुंदन एकनाथ म्हात्रे यांच्या मालकीची मालमत्ता मौजे कांचनगांव ता.कल्याण जि.ठाणे येथील भुमापन क्र.82/1/ब,क्षेत्रफळ 0-09-00,आकार 0-14 (9801 चौ.फुट)

फेर-लिलावाचे ठिकाण :- दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद, मुख्यालय, प्रशासकीय भवन, पुसद ता.पुसद जि.यवतमाळ.
फेर-लिलावाची दिनांक व वेळ :- दि.03/02/2025 रोज सोमवार दुपारी ठिक 1.00 वाजता.
टीप :-
1) फेर-लिलावाचे नियम व अटी बँकेच्या शाखा पनवेल येथे कार्यालयीन वेळेमध्ये नोटीस बोर्डवर तसेच वसुली विभागामध्ये पहावयास मिळेल.
2) जप्त स्थावर मालमत्ता प्रत्यक्ष पाहणीसाठी शाखा व्यवस्थापक शाखा पनवेल यांचेशी संपर्क साधावा मो.नं.7888097922
3) सदर विक्री व्यवहार हा उपरोक्त कायद्यास नियमास अधिन राहुन होईल.खालील सही करणार यांनी सदर व्यवहार करण्याचे,रद्द करण्याचे, स्थगित करण्याचे अधिकार राखुन ठेवले आहे.
4) फेर-लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रक्कम म्हणुन रु.1,00,000/- चा भरणा दि.03/02/2025 रोजी दुपारी ठीक 1.00 वाजण्या पुर्वी करावा लागेल.
5) फेर-लिलाव सुरु झाल्या नंतर एखादा व्यक्ती अनामत रक्कम भरणा करून फेर-लिलावात भाग घेऊ इच्छित असल्यास त्याला मंजुरी देणे अथवा न देणे वसुली अधिकारी ठरवतील.
6) बँकेला मिळालेल्या माहिती नुसार मालमत्तेवर इतर कोणतेही बोझे नाही परंतु काही कायदेशीर शासकीय बाकी निघाल्यास ती खरेदीदारास भरावी लागेल.
7) वरील नियम व अटी व्यतिरिक्त इतर नियम व अटी फेर-लिलावाच्या वेळी वाचुन दाखविल्या जातील.

वसुली अधिकारी
दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद
शाखा :- पनवेल

स्थळ :- पुसद
दिनांक :- 03/01/2025

ROHA HOUSING FINANCE GROW WITH YOUR OWN HOME

रोहा हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय : युनिट क्र. १११७ व १११८, ११ वा मजला, वर्ल्ड ट्रेड टॉवर, सेक्टर १६, नॉयडा, उत्तर प्रदेश २०१ ३०१.

ताबा सूचना (सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(१) अंतर्गत)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरीत रोहा हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड (यापुढे आरएचएफपीएल म्हणून संदर्भित) यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांचे नोंदणीकृत कार्यालय पत्ता जेजेटी हाऊस, ए४४/४५, रोड क्र. २, एमआयडीसी, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०९३ येथील सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४/२००२) व प्राप्त अधिकारान्वये सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या अनुच्छेद १३ (१२) अंतर्गत नियम ३ सहवाचन अंतर्गत कर्जदार (खालील निर्देशित नाव व पत्ता) सदर रक्कम व त्यावरील व्याज मंजूर दराने रक्कमेचे प्रदान सदर सूचनेच्या स्विकृत तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याकरिता सदर कायद्याच्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत त्यावरील पुढील व्याज व प्रासंगिक प्रभार यांच्यासह मागणी सूचना जारी केली होती. कर्जदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरित यांनी सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ सहवाचन सदर ॲक्टच्या अनुच्छेद १३ च्या उप-अनुच्छेद (४) अंतर्गत सहवाचन त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. विशेषत: कर्जदार व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे **रोहा हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्या प्रभारांतर्गत रक्कम व त्यावरील व्याज व अन्य प्रभार मागणी सूचनेच्या तारखेपासून सूचनेच्या तारखेपासून रकमेच्या अधीन असतील. कायद्याचे अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद (८) च्या तरतुदींअंतर्गत उपलब्ध कालावधीमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

कर्जदार/ सह-कर्जदार यांचे नाव व कर्ज खाते क्र./ शाखा	मालमत्तेचे विवरण	मागणी सूचना दिनांक व रक्कम	ताबा दिनांक
एलएएन : एचएलकेवायएनसीएसपीपीआर०००००५०१२१७३/ **शाखा :** कल्याण **१. श्रीम. स्नेहा प्रदिप सावंत पत्ता :** दुकान क्र. ३ सेंट्रल बँक बिल्डींग स्टेशन रोड, जनता फॅशनजवळ, ठाणे महाराष्ट्र ४०० ०९९. **२. श्रीम. सविता शिवराम सावंत व ३. श्री. शिवराम व्ही. सावंत सर्वांचा पत्ता :** फ्लॅट क्र. ४०२, आय विंग, ४ था मजला, लोढा ग्रीन, वास्तू वाटिका, अगरवाल कॉलेजजवळ, कल्याण, कल्याण महाराष्ट्र ४२१ ३०१. **सर्वांचा पत्ता :** फ्लॅट क्र. ४०३, ४ था मजला, पुजा कॉम्प्लेक्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., खोलासेवाडी सर्व्हे क्र. १९८, गाव कल्याण, कल्याण, महाराष्ट्र ४२१ ३०६.	सर्व तो भाग व भूखंड असलेला संपूर्ण मालमत्ता धारक : फ्लॅट क्र. ४०३, ४ था मजला, पुजा कॉम्प्लेक्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., खोलासेवाडी सर्व्हे क्र. १९८, गाव कल्याण, महाराष्ट्र ४२१ ३०६.	१५.०७.२०२४ व रु. २४,२०,३०७/-	३१.१२.२०२४

ठिकाण : महाराष्ट्र
दि. ०३.०१.२०२५

सही/- प्राधिकृत अधिकारी,
रोहा हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

केनरा बैंक Canara Bank भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking

सिंडिकेट Syndicate

असेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा - २, कॅनरा बँक बिल्डींग, ३ रा मजला, आदिमर्झबान पथ, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.
ईमेल : cb6289@canarabank.com **मो.** ८६५५९४८०५४ **दूर.** ८६५५९४८०१९

कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांना मागणी सूचना (अनुच्छेद १३(२)

संदर्भ: CB/6289/DN/HARSHA/2024/1 **दि. १८.१२.२०२४**

प्रति,
१. हर्षा शरद नागदा उर्फ हर्षा प्रकाश तिकाडिया, ०५ दिलीप केने बिल्डींग, नांदिवली रोड प्रगती कॉलेजजवळ, सुर्यप्रकाश-वाडी, दत्तनगर डोंबिवली (पूर्व), महाराष्ट्र पिन ४२१ २०१.
२. श्री. प्रकाश चंदुलाल तिकाडिया, ०५ दिलीप केने बिल्डींग, नांदिवली रोड प्रगती कॉलेजजवळ, सुर्यप्रकाश-वाडी, दत्तनगर डोंबिवली (पूर्व), महाराष्ट्र पिन ४२१ २०१.
३. श्री. प्रकाश चंदुलाल तिकाडिया, चुनाभट्टी फाटक, ए/३४, न्यु गिरीश अपार्टमेंट को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, पाटील गली चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२.

महोदय/महोदया,

विषय : सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत जारी सूचना

अधोहस्ताक्षरित हे कॅनरा बँक, एआरएम २ शाखा (यापुढे प्रतिभूत धनको म्हणून संदर्भित) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत सदर सूचना जारी करण्याकरिता याद्वारे सूचित केले आहे (यापुढे सदर ॲक्ट म्हणून संदर्भित) :

हर्षा शरद नागदा उर्फ हर्षा प्रकाश तिकाडिया व श्री. प्रकाश चंदुलाल तिकाडिया (यापुढे कर्जदार म्हणून संदर्भित) यांनी तुमच्याद्वारे अंमलात आणलेल्या विविध कर्ज दस्तावेज द्वारे संबंधित कॅनरा बँकेच्या नावे प्रतिभूती हितसंबंध म्हणून खालील लिखीत अनुसूची ए मध्ये अधिक विवरणीत मालमत्ता प्रतिभूत करण्याकरिता प्रतिभूती करारामध्ये प्रवेश करण्याकरिता व खालील अनुसूची बी मध्ये अहवालीत पत सुविधा/ सुविधा प्राप्त केली आहे.

तुम्ही अनुसूची बी मध्ये विवरणीत प्रतिभूत मालमतेचे करार केले होते.

त्यामुळे, फेब्रुवारी, २०२३ पासून सदर वित्तीय सहायता/ पत सुविधा आयोजित करून कार्यचलन अनियमित केले आहे. अनुसूची सी मध्ये निर्देशित व्याजासह अनुसूची सी मध्ये अहवालीत तपशील अनुसार **रु. ३३,८०,६२८.११ (रु. तेहत्तीस लाख ऐंशी हजार सहाशे अठ्ठावीस व अकरा पैसे मात्र)** चे प्रदान आमच्या बँकेच्या संबंधात तुमचे दायित्व म्हणून आमची बँक देखभाल करत आहे. पुढे सूचित करण्यात येते की, कर्जदार/ हमीदार यांच्या वेळेच्या अनुसार बँकेची थकबाकी पूर्ण करण्याकरिता सदर वरील कराराच्या अटींनुसार तुम्ही त्यावरील व्याजाचे प्रदान केले नाही आहे व त्यामुळे तुमची थकबाकी वसुल करण्याकरिता सदर सूचना देण्यात आली आहे. तुम्हाला वारंवार सूचना देउनही तुम्ही आमच्या बँकेसह तुमचे कर्ज पूर्ण केले नाही आहे. आमच्या वारंवार विनंती व मागणी करून सुद्धा तुम्ही थकित कर्ज व त्यावरील व्याजाचे प्रदान केले नाही आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी मालमत्ता स्पष्टीकरण अंतर्गत निर्देशनांनुसार तुमची मालमत्ता अकार्यरत मालमत्ता (एनपीए) म्हणून **२९.०५.२०२३** रोजी वर्गीकृत करण्यात येत आहे व बँकेने प्रमुख कर्ज हप्ते व व्याज यांच्यासह त्यांचे प्रदान करावे. तुमच्या दायित्वांच्या संदर्भात तुम्ही प्राप्त केलेल्या पत सुविधांचे नमूद विविध प्रतिभूतींद्वारे प्राधिकृत अधिकाऱ्यांची सर्वोत्तम माहिती व ज्ञानानुसार मालमत्तेवर कोणतेही भार नाहीत. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी सदर सूचनेच्या स्विकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत बँकेस अनुसूची सी मध्ये अहवालीत तुमचे दायित्वांचे संपूर्ण प्रभार करावे व ॲक्टच्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत करावे. पुढे सूचना देण्यात येते की, थकबाकींच्या वसुलीकरिता बँकेद्वारे प्रक्रिया करण्याच्या संबंधात दर सर्व मूल्य, प्रभार, खर्च व प्रासंगिक खर्च यांच्यासह दराने पुढील व्याजाचे प्रदान करावे.

कृपया नोंद घ्यावी की, तुम्ही जर सदर रक्कमेचे प्रतिभूत धनको यांचे प्रदान करण्यास कसूर केल्यास **रु. ३३,८०,६२८.११/- (रु. तेहत्तीस लाख ऐंशी हजार सहाशे अठ्ठावीस व अकरा पैसे मात्र)** व त्यावरील व्याज व प्रभार यांच्यासह सदर ॲक्टच्या अनुच्छेद वरील रक्कमेचे प्रदान कायद्याचे अनुच्छेद १३(२) च्या उपअनुच्छेद (४) (ए) व (बी) च्या अनुच्छेद १३ तरतुदींअंतर्गत उपलब्ध कालावधीमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे याची कृपया नोंद घ्यावी :

१३(४) - जर कर्जदारांनी उप-अनुच्छेद (२) मध्ये विहित कालावधीच्या आत संपूर्ण दायित्वांचे प्रदान करण्यास कसूर केल्यास प्रतिभूत धनको खालील प्रतिभूत कर्जाची वसुली करण्याकरिता खालील बाबींची नोंद घ्यावी, नावे :

ए) कर्जदार यांनी प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घ्यावा तसेच प्रतिभूत मालमत्तेच्या वसुलीकरिता भाडेकरार, जप्ती वा विक्री यांच्या मार्फत हस्तांतरण करण्याचे अधिकार त्यांच्याकडे आहेत.

बी) प्रतिभूत मालमतेच्या वसुलीकरिता कर्जदार यांनी व्यवस्थापनेच्या अंतर्गत हस्तांतरण करण्याचे अधिकार त्यांच्याकडे आहेत. कर्जाच्या वसुलीकरिता प्रतिभूती म्हणून कर्जदार यांनी व्यवसाचा भाग म्हणून केवळ भाडेकरार, जप्ती वा विक्री मार्फत हस्तांतरण अधिकार प्रदान केले आहेत :

पुढे तुम्ही व्यवसायाचा भाग म्हणून व्यवस्थापनाचा विभिन्नरित्या प्रतिभूत धनको म्हणून कर्जदारांचा सदर व्यवसाय सदर ॲक्टच्या लागू तरतूदी अंतर्गत कर्जाच्या प्रतिभूतीकरिता त्या संबंधात आहे.

सदर कायद्याच्या अन्य लागू तरतूदी अनुसार. कायद्याचे अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद (८) च्या तरतुदींअंतर्गत उपलब्ध कालावधीमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

तुम्हाला सूचना देण्यात येते की, प्रतिभूत धनकोंच्या लेखी अहवाल प्राप्त केल्याविना अनुसूची बी अनुसार प्रतिभूत मालमत्तेची विक्री करण्याकरिता विक्री, भाडेकरार वा अन्य यांच्या मार्फत कर्जदार/ हमीदार यांना अनुच्छेद १३(१३) च्या अंतर्गत हस्तांतरण करण्यात येणार नाही. आम्ही तुम्हाला अनुपालन न केल्यामुळे सदर कायद्याच्या अनुसूची बी अंतर्गत वरील तरतूदीअंतर्गत कायद्यांच्या अंतर्गत दंडनीय आहात आम्ही पुढे तुमचे लक्ष वेधून घेतो की, सदर कायद्याच्या अंतर्गत तुमच्या प्रतिभूत मालमत्तेच्या कपातीकरिता बंधनकारक असाल व थकबाकी रक्कमेचा भरणा सर्व मूल्य, प्रभार व उद्भवलेले खर्च हे बँकेद्वारे तुम्ही निविदा पाठवून सदर लिलाव/देकार आमंत्रण/निविदा/खाजगी संस्था यांच्या सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून वेळोवेळी देण्यात आली आहे. कृपया नोंद घ्यावी की, वरील सूचनेच्या प्रसिद्धी तारखेनंतर तुम्हाला तुमची प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्याचा अधिकार उपलबध नाही आहे.

सदर मागणी सूचना तुम्हाला देण्यात येते की, तुम्ही सदर मागणी सूचना कोणताही पूर्वग्रह न ठेवता देण्यात येत आहे व सदर कोणतेही हक्क वा मागण्या या अधिच्यागीत मानण्यात येतील व कोणत्याही मर्यादित मागणी शिवाय हक्क व पुढील मागण्या या तुम्हाला न विचारता विलंबित करण्यात येतील.

सदर सूचना ॲक्टच्या अंतर्गत प्रतिभूत धनकोंना त्यांचे कोणतेही अन्य हक्क उपलब्ध याविना देण्यात येईल व/वा कोणत्याही अन्य कायद्यानुसार करावे.

कृपया सदर सूचनेच्या अंतर्गत मागणी समवेत अनुपालन करून सर्व अनप्लेजंटनेस दूर करावी. जर नॉन-अनुपालन म्हणून पुढे सर्व मूल्य व कारणांकरिता तुमचे दायित्व धारक करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

कृपया नोंद घ्यावी की, सर्व पूर्वीची मागणी सूचना काढून जारी केली आहे.

धन्यवाद
तुमचा विश्वासू
सही/- प्राधिकृत अधिकारी

अनुसूची - ए (कर्जदार यांच्याद्वारे प्राप्त पत सुविधा तपशील)

अनु. क्र.	कर्ज क्र.	कर्ज स्वरूप/ मर्यादा (प्रतिभूत)	मंजूर दिनांक	रक्कम
१.	१६०००० ४६६७७४	गृह वित्त	३०.१२.२०२१	रु. २७,९०,०००/-
२.	१६४००१७३५८००	कॅनरा होम लोन सिक्युअर	०७.०१.२०२२	रु. २,०९,९३३/-

अनुसूची बी (प्रतिभूत मालमत्ता तपशील)

अनु. क्र.	स्थावर	मालमत्ता विवरण	हक्क धारक यांचे नाव
१.	**जमिन व इमारत**	फ्लॅट ४०२, चौथा मजला, बी विंग, मोजमापित ३०४ चौ. फूट चटई प्रोजेक्ट गजानन हाईट्स म्हणून ज्ञात, संगीतावाडी गाव आयरे, डोंबिवली (पू), तालूका कल्याण, जिल्हा ठाणे महाराष्ट्र पिन ४२१ २०१	**हर्षा शरद नागदा उर्फ हर्षा प्रकाश तिकाडिया व श्री. प्रकाश चंदुलाल तिकाडिया**

अनुसूची - सी (तारखेनुसार दायित्वांचे तपशील)

अनु. क्र.	कर्ज क्र.	कर्ज स्वरूप/ मर्यादा (प्रतिभूत)	दि. १०.१२.२०२४ अनुसार व्याजासह दायित्व	व्याजाचा दर +२% दंडात्मक व्याज
१.	१६०००० ४६६७७४	गृह वित्त	रु. ३१,३७,७२९.२५	९.१५ + २ = ११.१५%
२.	१६४००१७३५८००	कॅनरा होम लोन सिक्युअर	रु. २,४२,८९८.८६	९.५० + २ = ११.५०%

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL SRM invites online RFx (Ex. e-Tender) from the Registered Contractors for MAHATRANSCO e-Tendering (SRM) website for below mentioned work.

2nd **Call** E-tender No./ RFx No.**7000034700 -** Name of work: **"Procurement of Insulation Resistance Testing Kits / Tester for protection batches under PAC Circle Vashi."** Estimated Cost: **Rs.21,59,258/-** with Tender Fees: Rs. 500/-+ GST.

Date for Sale and Submission of the e-Tender Documents: From 02.01.2025 @ 11.00 Hrs to 09.01.2025 @ 11.00 Hrs.

For detailed information visit our website:
https://srmetender.mahatransco.in

For detailed information visit our website:
https://srmetender.mahatransco.in

Sd/-
Superintending Engineer,
Protection, Automation and
Communication Circle, Vashi.

AUTHUM ऑथम इन्वेस्टमेंट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : ७०७, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर